प्रेसनोट दिनांक ०१/०६/२०२३

**तहसिलदार कार्यालय, भिवंडी, जि.ठाणे येथील नायब तहसिलदार यांना लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी घेतले ताब्यात**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | ठाणे |
|---|---|
| स्टेशन डायरी नोंद क्र. | शांतीनगर पोलीस स्टेशन<br>स्टेशन डायरी नोंद क्र. २७/२०२३ वेळ १४:५८ वा. |
| लोकसेविकेचे नाव व कार्यालय | सौ.सिंधु उमेश खाडे, वय—५२ वर्षे, नायब तहसिलदार, तहसिलदार कार्यालय, भिवंडी जि.ठाणे |
| मागितलेली लाचेची रक्कम | १,५०,०००/—रूपये |
| स्वीकारलेल्या लाचेची रक्कम | ५०,०००/—रूपये |
| थोडक्यात हकीकत | यातील तक्रारदार हे व्यवसायाने वकील असुन त्यांचे अशीलाचे फेरफार हरकत नोंदणी प्रकरण लोकसेविका यांचेकडे प्रलंबित होते. सदर प्रकरणाचा अंतिम अहवाल व त्याची प्रत देण्याकरीता यातील लोकसेविका सौ.खाडे यांनी तक्रारदार यांचेकडे १,५०,०००/— रू. लाचेची मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी दि. २९/०५/२०२३ रोजी लेखी तक्रार केली होती.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. २९/०५/२०२३ रोजी केलेल्या पडताळणीमध्ये यातील लोकसेविका या तक्रारदार यांचेकडे नमुद कारणास्तव १,५०,०००/— रू. लाचेची मागणी करीत असल्याबाबत निष्पन्न झाले.<br>त्याअनुषंगाने आज दि. ०१/०६/२०२३ रोजी आयोजित केलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेविका सौ.खाडे यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेचा पहिला हप्ता म्हणुन ५०,०००/— रू. स्विकारले असता त्यांना १३:०९ वा लाचेच्या रक्कमेसह रंगेहात ताब्यात घेण्यात आले आहे. |

मार्गदर्शन अधिकारी :—

१) मा. श्री. सुनिल लोखंडे सो., पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

२) मा. श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

लाचलुचपत प्रतिंबधक विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका संबधी काही तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :—ला.प्र.वि. ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर ठाणे पश्चिम ४००६०१

सकेत स्थळ :—acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई—मेल :—spacbthane@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

अॅप्लीकेशन :—acbmaharashtra.net

टोलफ्रिनंबर :— १०६४

दुरध्वनी कमांक :—०२२—२०८१३५९८/२०८१३५९९

व्हॉट्सअॅप नं :— ९९३०९९७७००

दि. ०१/०६/२०२३

(सुरेश चोपडे)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.